ePaper

मध्य पूर्वेतील युद्धात आता भारताची थेट एन्ट्री?; ट्रम्प यांचा PM मोदींना फोन

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™





पान 3 वरुन...

पाणी आहे...पण पोहोचत नाही!

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 25 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## CMEC प्रकल्पाला वेग, मलाक्का पर्याय शोधत चीनची रणनीती

# चीनचा हिंद महासागरात वाढता प्रभाव; म्यानमारमार्गे भारताला नवा धोका

**महाईन्यूज ।** नवी दिल्ली

**मध्य पूर्वेतील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर चीनने हिंद महासागरात भारताला वेढा घालण्याच्या आपल्या नवीन धोरणाची अंमलबजावणी सुरू केली आहे. हे साध्य करण्यासाठी चीनने गृहयुद्धाशी झुंजत असलेल्या भारताचा शेजारी देश म्यानमारचा प्याद्यासारखा वापर केला आहे. म्यानमारमार्गे युनान, सिचुआन आणि गुइझोउ या अंतर्गत प्रांतांपर्यंत नवीन व्यापारी मार्ग उघडण्यासाठी चीन प्रयत्न करत आहे. ही योजना किमान ४० वर्षे जुनी आहे, परंतु या प्रकल्पाला अलीकडे मिळालेल्या गतीने सर्वांनाच आश्चर्यचकित केले आहे.**

म्यानमारमार्गे या तीन प्रांतांना हिंद महासागराशी जोडण्याचे चीनचे उद्दिष्ट आहे. यामुळे या प्रांतांना चिनी बंदरांपर्यंत पोहोचण्यासाठी लांब पल्ल्याच्या रस्ते आणि रेल्वेच्या अविकसित जाळ्यावर अवलंबून न राहता बाहेरील जगाशी व्यापार करणे शक्य होईल. असे झाल्यास बंगालच्या उपसागरापासून हिंद महासागरापर्यंत भारतासमोर एक नवीन आव्हान उभे राहील.

### भारताचं टेन्शन वाढणार

हिंद महासागरातील चीनच्या वाढत्या हालचालींमुळे भारताचा तणाव वाढू शकतो. चीन म्यानमारमार्गे जो नवीन कॉरिडॉर विकसित करत आहे, तो भारताच्या सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या अंदमान आणि निकोबार बेटांजवळून जाईल. यामुळे बंगालच्या उपसागरात चिनी जहाजे आणि युद्धनौकांची उपस्थिती वाढेल. बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावर भारतीय नौदलाचे अनेक महत्त्वाचे तळ आहेत, ज्यात विशाखापट्टणम येथील भारतीय नौदलाच्या पूर्व कमांडचे मुख्यालय आणि आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणमजवळ रामबिल्ली येथे असलेला भारतीय अणु-पाणबुड्यांचा मुख्य आणि सर्वात सुरक्षित परिचालन तळ, आयएनएस वर्षा यांचा समावेश आहे.



### म्यानमारमध्ये चीन काय करतंय?

चीनने या प्रकल्पाला "चीन-म्यानमार आर्थिक कॉरिडॉर" (CMEC) असे नाव दिले आहे. तज्ञांच्या मते हा प्रकल्प केवळ व्यापारी मार्ग विकसित करण्यापुरता मर्यादित राहणार नाही उलट, चीन बंगालच्या उपसागरात आपला राजकीय आणि लष्करी प्रभाव वाढवण्यासाठी त्याचा वापर करेल. मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे सागरी अस्थिरता शिगेला पोहोचली आहे. या संदर्भात म्यानमारमार्फत दीर्घकालीन सामरिक उद्दिष्टे साध्य करणे हे चीनच्या सुरक्षा नियोजकांसाठी पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाचे झाले आहे. चीन या मार्गाद्वारे एक पर्यायी व्यापारी मार्ग विकसित करण्याचाही प्रयत्न करत आहे, ज्याचा उपयोग तो संकटाच्या काळात करू शकेल. यामुळे चीनची आर्थिक आणि लष्करी शक्ती वाढेल आणि त्याची जोखीम पत्करण्याची क्षमताही वाढेल.

### होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे चीनला चिंता



इराणवर इस्रायल आणि अमेरिकेने केलेल्या हल्ल्यांपासून होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारा व्यापार जवळजवळ थांबला आहे. याचा चीनच्या तेल आणि गॅस आयातीवर गंभीर परिणाम झाला आहे. चीन अनेक दशकांपासून इराणचा एक प्रमुख मित्रराष्ट्र राहिला आहे. त्यामुळे भविष्यात तणाव वाढल्यास चीनला मलाक्काच्या सामुद्रधुनीतून जाणे कठीण होऊ शकते हे चीनला माहित आहे. मलाक्काची सामुद्रधुनी हा हिंद महासागरापासून दक्षिण चीन समुद्रापर्यंत जाणारा एक अरुंद सागरी मार्ग आहे. त्यामुळे चीन मलाक्काची सामुद्रधुनी ओलांडल्याशिवाय आपल्या देशात तेल आणि गॅसची वाहतूक करण्यासाठी पर्यायी मार्गांवर वेगाने काम करत आहे. म्यानमारमधून बांधला जात असलेला आर्थिक कॉरिडॉर हा देखील चीनच्या धोरणाचा एक भाग आहे. चीन केवळ याच मार्गावर काम करत नाही. पाकिस्तानचे ग्वादर बंदर देखील अशाच धोरणांतर्गत विकसित केले गेले आहे.

### चीनसाठी हिंद महासागर किती महत्त्वाचा?

आकडेवारीनुसार, चीनच्या आयात केलेल्या कच्च्या तेलापैकी सुमारे ८० टक्के तेल हिंद महासागरातून येते. इराण हा त्याचा मुख्य तेल पुरवठादार आहे. चीन रशिया आणि इतर मध्य आशियाई देशांकडून पाइपलाइनद्वारे नैसर्गिक गॅस आयात करतो. तरीही त्याच्या गॅस आयातीपैकी ३० ते ६० टक्के गॅस वाहतूक हिंद महासागरातूनच होतो. चीन आफ्रिकेतून मोठ्या प्रमाणात खनिजे देखील आयात करतो, जी जहाजांद्वारे हिंद महासागरातून चीनच्या पूर्वेकडील बंदरांपर्यंत पोहोचवली जातात. याशिवाय, मध्य पूर्व, युरोप आणि आफ्रिकेतील बाजारपेठांमध्ये माल निर्यात करण्यासाठी चीन हिंद महासागरावर अवलंबून आहे. एकूणच, चीनचा सुमारे ६५ टक्के सागरी व्यापार हिंद महासागरातून होतो.

# खडकवासल्यातून सुमारे २ कोटी लिटर पाणी गेले वाया; उन्हाळी आवर्तनास बसणार तडाखा

## अतिक्रमण व देखभालीअभावी वाढल्या घटना; २० एमएलडी पाणी वाया, कारण अद्याप अस्पष्ट

**महाईन्यूज । पुणे**

**खडकवासला धरणाच्या नवीन उजवा मुठा कालव्यास मुंढवा भागातील शिंदे वस्तीत (किलोमीटर २२) अचानक भगदाड पडल्यामुळे सुमारे २ कोटी लिटर पाणी (२० एमएलडी) वाया गेले. भगदाड कशामुळे पडले, याचे कारण अजूनही अस्पष्ट आहे. यामुळे उन्हाळी आवर्तनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, भगदाड भरण्यासाठी किमान चार ते पाच दिवसांचा कालावधी लागणार आहे, अशी माहिती खडकवासला प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी दिली.**



कालव्याला भगदाड पडल्याची माहिती मिळताच 'जलसंपदा'च्या खडकवासला प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांच्यासह कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर खडकवासला धरणातून कालव्यावाटे वाहणारे पाणी बंद केले. कालवा सकाळी सहा वाजण्याच्या आसपास फुटला असून, त्यामधील पाणी कमी होण्यास दुपारचा एक वाजला. भगदाड पडलेल्या ठिकाणचे पाणी बंद करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्यात आले. मात्र, उशिराने पाण्याचा प्रवाह थांबला. दरम्यान, पडलेले भगदाड भरण्यासाठी किमान चार ते पाच दिवसांचा कालावधी लागणार आहे. तसेच भगदाड कशामुळे पडले. याचे कारण अजूनही अस्पष्ट आहे. भगदाड पडल्यामुळे उन्हाळी आवर्तनावर परिणाम होण्याची शक्यता आहे, अशी माहिती देशमुख यांनी दिली. खडकवासला धरणामधून नवीन उजवा कालवा थेट इंदापूरपर्यंत असून, याची लांबी १३४ किलोमीटर आहे. शहरातून हा कालवा वाहत आहे.

> शिंदे वस्ती येथे नवीन उजवा मुठा कालव्याचे मोठे भगदाड पडल्यामुळे सुमारे २० एमएलडी पाणी वाया गेले. या कालव्याचे काम पूर्ण करण्यास किमान तीन ते चार दिवसांचा कालावधी लागणार आहे. कालवा कशामुळे फुटला, याची माहिती घेण्याचे काम सुरू आहे.
>
> - किरण देशमुख, कार्यकारी अभियंता, खडकवासला प्रकल्प

मागील अनेक वर्षांपासून या कालव्याच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली असून, राडारोडादेखील टाकण्यात येत असल्यामुळे या कालव्याची खोली कमी झाली आहे.. दरम्यान, या कालव्याचे बांधकाम १९६५ मध्ये पूर्ण झाले. त्यामुळे हा कालवा अत्यंत जुना झाला असून, वारंवार पाणी गळती, अतिक्रमणे, राडारोडा टाकण्यात येत असल्यामुळे कालवा फुटण्याच्या घटना घडत आहेत.

### जुन्या कालव्यांची देखभाल ठरतेय महत्त्वाची

खडकवासला धरणातून जाणारा नवीन उजवा मुठा कालवा १९६५ साली पूर्ण झाल्याने तो अत्यंत जुना झाला आहे. कालव्याच्या कडेला वाढलेली अतिक्रमणे, टाकला जाणारा राडारोडा आणि अपुरी दुरुस्ती यामुळे कालव्याची क्षमता कमी होत असून भगदाड पडण्याच्या घटना वाढत आहेत. वेळोवेळी मजबुतीकरण, स्वच्छता आणि अतिक्रमणांवर कठोर कारवाई न झाल्यास पाणीगळतीसह मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होण्याचा धोका कायम राहणार आहे.

# पुणे मेट्रोत मोठी चूक; बोगद्याला ६ इंचांचे छिद्र, गुन्हा दाखल

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील मेट्रो प्रकल्पाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. शहरातील भूमिगत मेट्रो बोगद्यावर थेट बोअरवेल मारण्यात आल्याने बोगद्यावर खड्डा पडला आहे. याप्रकरणी खडक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पुणे शहरात भूमिगत मेट्रो प्रकल्पाच्या कामादरम्यान मोठी निष्काळजीपणा समोर आला आहे. शिवाजीनगर ते स्वारगेट दरम्यान धावणाऱ्या भूमिगत मेट्रोच्या बोगद्यावर थेट बोअरवेल मारण्यात आल्याने बोगद्यात सुमारे ६ इंचांचा खड्डा पडल्याची घटना उघडकीस आली आहे. १४ मार्च रोजी शुक्रवार पेठ परिसरात हा प्रकार घडला.

थेट बोगद्याच्या वरच बोअरवेल मारल्यामुळे बोगद्याचे नुकसान झाले असून त्या ठिकाणी पाणी गळतीही सुरू झाली आहे. या प्रकरणी पुणे मेट्रोचे संयुक्त महाव्यवस्थापक शंतनु गोरात्रा यांनी तक्रार दाखल केली आहे. तर मूळ घरमालक धनंजय मोटे आणि जगताप नामक ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घराखालून भूमिगत मेट्रो बोगदा जात असल्याची पूर्ण माहिती होती. तरीही आरोपींनी जाणीवपूर्वक आणि निष्काळजीपणे बोअरवेलचे काम केले. या कृत्यामुळे केवळ मेट्रोच्या बोगद्यालाच नव्हे तर नागरिकांच्या जीवितासही धोका निर्माण झाला आहे. या घटनेत मेट्रोच्या मालमत्तेचे सुमारे २ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. हा प्रकल्प केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त निधीतून राबवला जात असल्याने सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणीही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भूमिगत प्रकल्पांभोवती 'नो-डिग' नियमांची गरज

शहरात वाढत्या भूमिगत प्रकल्पांमुळे (मेट्रो, पाइपलाइन, केबल नेटवर्क) जमिनीखालील संरचना अत्यंत संवेदनशील बनल्या आहेत. अशा भागांत बोअरवेल, खोदकाम किंवा बांधकाम करण्यापूर्वी संबंधित प्राधिकरणांची परवानगी घेणे आणि अचूक नकाशे तपासणे अनिवार्य असणे गरजेचे आहे. नियमांकडे दुर्लक्ष केल्यास केवळ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसानच होत नाही, तर नागरिकांच्या जीवितालाही गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे 'नो-डिग झोन'ची स्पष्ट अंमलबजावणी, जनजागृती आणि कडक कारवाई ही काळाची गरज ठरत आहे.

# कोट्यवधी लिटर पाणी 'गायब'; व्यवस्थेतील त्रुटींमुळे शहर तहानलेले

# पाणी आहे... पण पोहोचत नाही!



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरात सुमारे अडीच ते तीन हजार किलोमीटर लांबीचे जलवाहिनी जाळे, ४५० ते ५५० दशलक्ष लिटर साठवण क्षमता आणि मोठ्या जला-शयांतून होणारा पाणी पुरवठा... अशी भक्कम यंत्रणा असता नाही नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असल्याने पाणीपुरवठा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

शहराला प्रामुख्याने पवना, आंद्रा, तसेच भामा-आसखेड या धरणातून पाणीपुरवठा केला जातो. दररोज सुमारे ५५० ते ६५० एमएलडी पाणी उपलब्ध असतानाही अनेक भागांत कमी दाब, अनियमित पुरवठा आणि टंचाईचे चित्र कायम आहे. शहरात पुरेसे पाणी उपलब्ध असूनही गळती, चोरी, नियोजनाचा अभाव आणि अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे टंचाई निर्माण होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात हीच परिस्थिती उद्भवत असताना प्रशासनाकडून ठोस व दीर्घकालीन उपाययोजना होत नसल्याने नागरिकांचा संताप वाढत आहे. आता तरी गळती रोखणे, अनधिकृत वापरावर कारवाई आणि पाणीपुरवठ्याचे शास्त्रीय नियोजन या बाबींवर भर दिला नाही, तर "पाणी आहे; पण पोहोचत नाही" हीच शहराची कायमची ओळख ठरणार, अशी भीती व्यक्त होत आहे.

## पाणी चोरी आणि मोटारींचा खेळ

काळेवाडी, वाकड, थेरगावसारख्या भागांत अनधिकृत नळजोडणी आणि मोटारी लावून पाणी खेचण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे प्रेशर कमी होऊन नियम पाळणाऱ्या नागरिकांना पाणी मिळत नाही. कारवाईसाठी राजकीय दबाव येत असल्याचीही चर्चा रंगत आहे.

## 'दाब' नसलेला पाणीपुरवठा

निगडी प्राधिकरण, चऱ्होलीसारख्या भागांत पाणी इतक्या कमी दाबाने येते की, वरच्या मजल्यांपर्यंत पोहोचत नाही. काही ठिकाणी पिवळसर व दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याच्या तक्रारी आहेत. परिणामी, नागरिकांना मोटारी, टाक्या, टँकर किंवा वॉटर एटीएमचा आधार घ्यावा लागत आहे.

## गळतीतूनच हजारो लिटर पाणी 'गायब'


शहरातील जुनी व गंजलेली पाइपलाइन, निकृष्ट दर्जाची कामे आणि अपुरी देखभाल यामुळे ४० टक्क्यांहून अधिक प्रमाणावर पाणी गळती होत आहे. अनेक ठिकाणी पाणीपुरवठा सुरू होताच रस्त्यावर पाणी वाहताना दिसते. भूमिगत गळतीचा तर हिशोबच नसल्याने दररोज हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचे वास्तव आहे.

# वडिलांनी मोबाइल चेक केला; नैराश्यातून मुलीने उचलले टोकाचे पाऊल

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**वडिलांनी मोबाइल चेक केल्याच्या कारणावरून एका १६ वर्षीय मुलीने १७ मार्च रोजी विष प्राशन केले. उपचाराच्या दरम्यान रविवारी (दि. २२ मार्च) तिचा मृत्यू झाला. ही घटना चिखली येथील जाधववाडी येथे घडली.**

प्रतीक्षा अनिल गायकवाड (वय १६, रा.जाधववाडी, चिखली) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. चिखली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विठ्ठल साळुंके यांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ मार्च रोजी प्रतीक्षा हिचा मोबाइल तिच्या वडिलांनी चेक केला. त्यामध्ये आक्षेपार्ह असे काहीच आढळून आले नाही. मात्र, वडिलांनी आपला मोबाइल चेक केल्यामुळे आलेल्या नैराश्यातून प्रतीक्षा हिने त्याच दिवशी रात्री नऊच्या सुमारास राहत्या घरात विष प्राशन केले. ही बाब तिच्या कुटुंबीयांच्या लक्षात येताच, तिला त्वरित रुग्णालयात दाखल केले. उपचाराच्या दरम्यान रविवारी (दि. २२ मार्च) तिचा मृत्यू झाला. महापालिकेच्या पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर, मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला.




## मोबाइल, मानसिक ताण आणि संवादाचा अभाव ठरतोय घातक

अल्पवयीन मुलांमध्ये मोबाइल वापर, गोपनीयता आणि पालकांच्या नियंत्रणावरून निर्माण होणारे तणावाचे प्रसंग दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. किशोरवय हा मानसिकदृष्ट्या अतिशय संवेदनशील टप्पा असल्याने छोट्या कारणांमुळेही मुलांवर मोठा मानसिक परिणाम होऊ शकतो. संवादाऐवजी संशय किंवा कठोर भूमिका घेतल्यास मुलांमध्ये भीती, अपराधीपणा आणि नैराश्य वाढण्याची शक्यता असते. तज्ज्ञांच्या मते, अशा परिस्थितीत पालकांनी मुलांशी मित्रत्वाने, विश्वासाने आणि संयमाने संवाद साधणे आवश्यक आहे. त्यांच्या भावना समजून घेऊन योग्य मार्गदर्शन, समुपदेशन आणि भावनिक आधार दिल्यास अशा टोकाच्या घटना टाळता येऊ शकतात. समाजातही मानसिक आरोग्याबाबत जागरूकता वाढवणे, शाळा-कॉलेजमध्ये समुपदेशन सेवा उपलब्ध करून देणे आणि कुटुंबात खुल्या संवादाचे वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे.



## भूमिका

**जगातला सर्वांत आनंदी देश कोणता? आणि जगातला सर्वांत दुःखी देश कोणता? या यादीत भारत किंवा आपला देश कुठल्या स्थानावर आहे? ही माहिती जाणून घेण्याची जगभरातील अनेकांना उत्सुकता असते. त्यामुळेच संयुक्त राष्ट्र दरवर्षी जाहीर करीत असलेला 'वर्ल्ड हॅपिनेस रिपोर्ट' आणि त्याच्या निष्कर्षाकडे अनेकांचं लक्ष लागून असतं.**

# मध्य पूर्वेत पेटलेल्या युद्धात कोण कुणाचे प्यादे आहे?

पश्चिम आशियात पेटलेले युद्ध केवळ दोन-तीन देशांपुरते मर्यादित न राहता संपूर्ण आखाती प्रदेशाच्या स्थैर्याला हादरा देणारे ठरत आहे. अमेरिका आणि इस्रायलविरुद्ध उभा ठाकलेला इराण थेट संघर्ष टाळत, अप्रत्यक्ष आणि रणनीतिक मार्गाने आपली आक्रमकता दाखवत आहे. इस्रायलवर थेट निर्णायक हल्ले करण्याऐवजी इराणने संयुक्त अरब अमिरात, सौदी अरेबिया, कतार, कुवेत आणि बहारीनसारख्या सुन्नी अरब देशांना लक्ष्य केले, हे या संघर्षाचे सर्वात करडे वास्तव आहे. यामागे केवळ युद्धनीती नाही, तर शिया-सुन्नी मतभेदांचा दीर्घ इतिहास आणि भूराजकीय समीकरणे दडलेली आहेत.



या युद्धात इराणने सुमारे ६० टक्के दारूगोळा इस्रायलऐवजी अमेरिकी तळ आणि आखाती आस्थापनांवर वापरला, ही बाब अत्यंत महत्त्वाची ठरते. दुबईसारख्या जागतिक आर्थिक केंद्रावर हल्ले, तेलसाठ्यांचे नुकसान, विमानसेवा विस्कळीत होणे आणि ऊर्जा प्रकल्पांवर आघात यामुळे या देशांच्या अर्थव्यवस्थांना मोठा फटका बसला आहे. तेलाच्या किंमती ११० डॉलरपर्यंत झेपावल्या असून, पर्यटन आणि व्यापारावर आधारित अर्थव्यवस्था डळमळीत झाल्या आहेत. दररोज कोट्यवधी डॉलर्सचे नुकसान सहन करणाऱ्या या देशांसाठी हा संघर्ष आर्थिक संकटाचे रूप धारण करू शकतो.

इराणची ही रणनीती स्पष्टपणे अमेरिकेवर अप्रत्यक्ष दबाव निर्माण करण्याची आहे. सुन्नी अरब राष्ट्रे अमेरिकेच्या संरक्षणछत्राखाली असल्याने, त्यांच्यावर हल्ले करून अमेरिका युद्धात अधिक गुंतावी आणि तिचा खर्च वाढावा, हा त्यामागील उद्देश दिसतो. इस्रायलसारख्या सशक्त आणि संरक्षित राष्ट्रावर थेट आघात करण्याऐवजी इराणने तुलनेने कमी प्रतिकार असलेल्या आखाती देशांना लक्ष्य केले आहे.

दुसरीकडे, अरब देशांनी दाखविलेला संयमही तितकाच महत्त्वाचा आहे. या देशांनी इराणच्या हल्ल्यांचा निषेध केला असला, तरी थेट युद्धात उतरायला ते तयार नाहीत. यामागे त्यांच्या अर्थव्यवस्थांचे संरक्षण, तेलउद्योगावर होणारा संभाव्य परिणाम आणि लष्करी क्षमतेची मर्यादा ही कारणे आहेत. इराणशी थेट संघर्ष म्हणजे आर्थिक आत्मघात ठरेल, याची त्यांना पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे ते अमेरिकेकडूनच निर्णायक कारवाईची अपेक्षा ठेवून आहेत.

या सर्व घडामोडींमध्ये एक गोष्ट प्रकर्षाने समोर येते— युद्धाचा खरा फटका तो प्रत्यक्ष लढणाऱ्यांपेक्षा इतरांनाच अधिक बसतो. इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्या सत्तासंघर्षात आखाती देश आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या होरपळून निघत आहेत. त्यामुळे या युद्धाचा विस्तार रोखणे आणि राजनैतिक तोडगा काढणे हीच काळाची गरज आहे. अन्यथा, या संघर्षाच्या ज्वाला केवळ पश्चिम आशियापुरत्याच मर्यादित न राहता जागतिक अस्थिरतेचे मोठे संकट निर्माण करू शकतात.

## प्रासंगिक »

### बालकाचे प्रसंगावधान

***प्रणव हा केवळ चार वर्षांचा के. जी. मध्ये शिकणारा मुलगा. खंडेराजुरी खेड्यातला.***

सकाळच्या वेळी सर्व लोक कोणी गोठ्यात गुरांपाशी. कोणी कोठे कामात गुंतलेले. प्रणव अंगणात हुंदडत होता. त्याने पाहिले त्याचा दोन वर्षांचा चुलत भाऊ पळता पळता एका हौदात पडला. प्रणव धावून गेला. त्याने नेहूलला काढण्याचा प्रयत्न केला. तीन फूट पाणी होते. खाली शेवाळे असल्याने नेहूलला हौदात उभे राहता येईना. प्रणव पळत घरात गेला. वडील स्नानगृहात होते. प्रणवने हाका मारल्या, दारावर हाताने थापा मारल्या, पण पाण्याच्या आवाजाने वडिलांना ऐकू गेले नाही. तेव्हा प्रणवने काय करावं ? अक्षरशः बोंब मारायला सुरुवात केली. तेव्हा वडील लगेच बाहेर आले. प्रणवने त्यांना हौदाकडे नेले. नेहूलला वडिलांनी बाहेर काढले. पण त्याचे डोळे पांढरे झाले होते. माणसे जमली. नेहूलला उलटा करूनपोटातील पाणी काढून इलाज सुरु केला. यश आले. बाल प्रणव-च्या प्रसंगावधानामुळे नेहूलचे प्राण वाचले. सर्वांनी त्याचे तोंड भरुन कौतुक केले. ही घटना नुकतीच मार्चमध्ये घडली आहे.

**तात्पर्य : लहान असो वा मोठा, संकटाच्या वेळी धैर्य, प्रसंगावधान आणि योग्य वेळी घेतलेला निर्णय जीव वाचवू शकतो.**

अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि तथाकथित 'बाबा' संस्कृतीविरोधात कायदे अस्तित्वात असतानाही अशा प्रवृत्तींचे वाढते प्रस्थ हे राज्यव्यवस्थेसमोरचे मोठे अपयश मानावे लागेल. अलीकडील प्रकरणात एका तथाकथित बाबाच्या वाढत्या प्रभावामागे केवळ त्याची फसवणूक करणारी वृत्तीच कारणीभूत नाही, तर त्याला मिळालेला राजकीय आणि प्रशासकीय आश्रय अधिक गंभीर ठरतो.

# बाईबळीवर बोळवण?



म्हणूनच केवळ एखाद्या व्यक्तीला पदावरून दूर करणे ही उपाययोजना अपुरी ठरते; या संपूर्ण साखळीची जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा पदावरून संबंधित व्यक्तीची हकालपट्टी ही निश्चितच एक योग्य पाऊल मानता येईल. मात्र, मूळ प्रश्न असा आहे की अशा अयोग्य व्यक्तींची नियुक्तीच का आणि कशी होते? कोणत्या निकषांवर त्यांना महत्त्वाच्या पदांवर बसवले जाते? हा केवळ प्रशासकीय त्रुटीचा मुद्दा नसून, राजकीय शिफारशी आणि प्रभाव यांचे द्योतक आहे. त्यामुळे ही घटना 'चूक झाली आणि दुरुस्त केली' एवढ्यावरच मर्यादित न राहता, जबाबदारी निश्चित करण्याची गरज अधोरेखित करते.

या प्रकरणात सर्वात गंभीर बाब म्हणजे संबंधित भोंदू व्यक्तीला विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांचा मिळालेला उघड पाठिंबा. सत्ताधारी असोत किंवा विरोधी पक्षातील नेते—अनेकांनी या व्यक्तीच्या आश्रमाला भेटी दिल्या, त्याच्या प्रभावाखाली गेले, आणि अप्रत्यक्षपणे त्याचे प्रस्थ वाढवले. राजकीय नेत्यांच्या या वर्तनामुळे समाजात चुकीचा संदेश जातो आणि अंधश्रद्धेला खतपाणी मिळते. नेता ज्या ठिकाणी माथा टेकवतो, तेथे सामान्य अनुयायीही त्याचे अनुकरण करतात, हे वास्तव नाकारता येत नाही. याचबरोबर प्रशासकीय यंत्रणेची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात सापडते. इतक्या मोठ्या प्रमाणात मालमत्ता उभी राहत असताना, आर्थिक व्यवहार होत असताना, संबंधित यंत्रणांनी काणाडोळा कसा केला? साधा नागरिक घर खरेदी करतानाही अनेक अडचणींना सामोरा जातो, तर अशा व्यक्तींची कोट्यवधींची संपत्ती विनाअडथळा कशी उभी राहते? यामागे संगनमत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे हे प्रकरण दाखवते. त्यामुळे या प्रकरणाचा उपयोग केवळ एका घटनेपुरता न ठेवता, व्यापक कारवाईची संधी म्हणून पाहणे आवश्यक आहे. संबंधित बाबाला मदत करणाऱ्या सर्व राजकीय नेते, अधिकारी आणि इतर घटकांवर गुन्हे दाखल करूनच या व्यवस्थेवर विश्वास निर्माण होऊ शकतो.

शेवटी, ही केवळ एका व्यक्तिविरोधातील कारवाई नसून, समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन प्रस्थापित करण्याची कसोटी आहे. केवळ दिखाऊ पावले उचलून हे प्रकरण मिटवण्याऐवजी, सखोल चौकशी आणि कठोर कारवाईद्वारेच अंधश्रद्धेच्या मुळावर प्रहार करता येईल. अन्यथा, अशा घटना पुन्हा पुन्हा घडत राहतील आणि समाजाची दिशाभूल होतच राहील.

## ॥ अभंगवाणी ॥



आतां कोठें धांवे मन ।
तुझे चरण देखिलिया ॥१॥

भाग गेला सीण गेला ।
अवघा जाला आनंद ॥२॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भोंदूबाबा खरातचा भांडाफोड

## भोंदूबाबा पोलिसांच्या जाळ्यात कसा अडकला? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली माहिती

**महाईन्यूज । मुंबई**

**नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे संबंध महाराष्ट्रात खळबळ उडालेली असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत या प्रकरणाची सविस्तर माहिती देत आतापर्यंत सरकारकडून कोणती कारवाई करण्यात आली, याची माहिती दिली. अशोक खरात याच्या विकृत कृत्यांचा पाढाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत वाचला.**



या प्रकरणात पीडित महिलांची ओळख सुरक्षित ठेवून तपास कसा केला जात आहे आणि खरातच्या संपत्तीची चौकशी कशी होणार, याचा सविस्तर तपशीलही त्यांनी सादर केला.

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात पोलिसांनी ६ पीडित महिलांची ओळख पटवून त्यापैकी पाच पीडित महिलांच्या जबाबावरून ५ गुन्हे आणि एका साक्षीदाराच्या जबाबावरून त्याच्या पत्नीविषयी घडलेल्या प्रकाराबाबत एक गुन्हा असे एकूण सहा गुन्हे नोंद केले आहेत.

या संपूर्ण प्रकरणात एकूण आठ गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यापैकी सात गुन्ह्यांचा तपास आयपीएस तेजस्विनी सातपुते यांच्या अध्यक्षतेखालील एसआयटीकडून केला जात आहे. तर एका गुन्ह्याचा तपास नाशिक शहर क्राइम युनिटकडून केला जात आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. वावी आणि शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या दोन्ही गंभीर गुन्ह्यांचा तापस करण्यासाठी १३ मार्च रोजी विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. यानंतर १७ मार्च २०२६ रोजी एका महिलेने सरकारवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. आपल्या धार्मिक विश्वासाचा फायदा घेऊन आणि गुंगीचे औषध देऊन खरातने अत्याचार केल्याचे पीडितेने सांगितले. या गुन्ह्यानंतर अशोक खरातला त्याच दिवशी रात्री अटक करण्यात आली.

### आतापर्यंत काय काय घडले?

- २९ डिसेंबर २०२५ रोजी अशोककुमार खरात याने नाशिकच्या वावी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. आरोपी दिनेश परब याने खरात आणि एका महिलेचे फोटो पाठवून ते व्हायरल करण्याची धमकी दिली. फोटो व्हायरल न होऊ देण्यासाठी पाच कोटी रुपयांची खंडणी मागितली. तसेच हे फोटो राजेंद्र जासूद याने दिल्याचे सांगितले. याप्रकणी दिनेश परब आणि जासूद विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.
- आरोपी राजेश परब याला उच्च न्यायालयाकडून अंतरिम जामीन आणि त्याचा सहकारी राजेंद्र जासूदला जिल्हा न्यायालयातून अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे. खरातच्या कार्यालयातील कर्मचारी नीरज जाधव याचा या गुन्ह्यातील सहभागाबाबत आजपर्यंतच्या तपासातून काहीही निष्पन्न झालेले नाही. हा या गुन्ह्याचा पहिला भाग आहे. ज्यात खरातने गुन्हा दाखल केला होता.
- १८ फेब्रुवारी २०२६ रोजी एका महिलेने शिर्डी येथे तक्रार दिली की, तिचा मॉर्फ केलेला फोटो आरोपी नीरज जाधवने शेअर करून तो व्हायरल करण्याची धमकी दिली. यावरून शिर्डी पोलीस ठाण्यात विविध कलमाअंतर्गत नीरज जाधव विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.
- अशोक खरातने अनेक महिलांना जादूटोणा, तंत्र-मंत्र वापरून त्यांच्याशी अश्लिल चाळे केल्याचे दिसून आले. ज्या साक्षीदाराने हे व्हिडीओ दिले, त्याला खरातकडून जीवाल धोका निर्माण होण्याची भीती होती. पोलिसांनी त्याला विश्वासात घेऊन खरात विरोधातील व्हिडीओ ताब्यात घेतले.
- खरात देशाबाहेर पळून जाण्याची शक्यता होती. त्यामुळे १० मार्च २०२६ रोजी त्याच्याविरोधात लुक आऊट सर्क्युलर नोटीस काढून त्याला देशाबाहेर जाण्यापासून रोखले.

# हजारो महापालिका कर्मचाऱ्यांना मिळणार कायमस्वरूपी घर

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबईच्या रस्त्यांची स्वच्छता राखण्याची जबाबदारी पार पाडणाऱ्या महानगरपालिका स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक अशी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. गृहनिर्माणाबाबतच्या त्यांच्या प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या मागणीसंदर्भात सरकारने आता एक सकारात्मक पाऊल उचलले आहे. ज्यामुळे हजारो कुटुंबांना कायमस्वरूपी घरे मिळण्याची आशा पल्लवित झाली आहे.**




महापालिका कामगार संघटनेने आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर राज्यातील राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर हालचालींना वेग आला. परिस्थिती गंभीर होण्यापूर्वीच विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या मध्यस्थीने संघटनेचे प्रतिनिधी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली आणि अनेक मुद्द्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यात आला.

बैठकीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक मोठी आणि दिलासादायक घोषणा केली. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसफलता आवास योजना' अंतर्गत मुंबईत उभारण्यात येणाऱ्या एकूण १२,२०० घरांपैकी तब्बल ५० टक्के घरे स्वच्छता कर्मचाऱ्यांना मालकी तत्त्वावर देण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. २००८ आणि २०१५ मध्ये काढण्यात आलेल्या शासकीय आदेशांच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे सुमारे ३०,००० हून अधिक स्वच्छता कर्मचारी कुटुंबांना कायमस्वरूपी निवाऱ्याचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अनेक वर्षांपासून भाड्याच्या घरात किंवा अस्थायी निवाऱ्यांमध्ये राहणाऱ्या या कुटुंबांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. स्वतःचे घर असावे, ही त्यांची अनेक वर्षांची इच्छा आता पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. या निर्णयामुळे केवळ निवाऱ्याचा प्रश्न सुटणार नाही, तर त्यांच्या जीवनमानातही मोठी सुधारणा होणार आहे. सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीनेही हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

मुख्यमंत्री यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ही केवळ घोषणा नसून, या योजनेची अधिकृत अंमलबजावणी सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनादरम्यानच जाहीर केली जाईल. त्यामुळे कामगारांमध्ये विश्वास आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या बैठकीला संघटनेचे अध्यक्ष अशोक जाधव, वामन कवीस्कर, हिंदुराव जाधव यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते. एकंदरीत, हा निर्णय केवळ घरांचे वाटप करण्यापुरता मर्यादित नसून, तो स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सन्मान, सुरक्षितता आणि स्थैर्याशी निगडित आहे. मुंबई स्वच्छ आणि सुंदर ठेवणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे पाऊल ठरणार आहे. त्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न आता साकार होण्याच्या दिशेने ठामपणे पुढे सरकत असल्याचे चित्र या निर्णयामुळे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे हजारो महापालिका कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांमध्ये एकप्रकरचे आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# इराणकडून भारताला तेलाची बंपर ऑफर

## काही व्यापारी भारतीय रुपयांमध्येही पेमेंट स्वीकारण्यास तयार

**महाईन्यूज । इराण**

**युद्धाच्या पार्श्वभूमीवर जगातील अनेक देशांमध्ये तेल आणि गॅसचं संकट निर्माण झालं आहे. भारतातही मोठ्या प्रमाणावर इंधन संकट उभं राहण्याची शक्यता निर्माण झालीय. त्यातच आता एक मोठी दिलासादायक बातमी समोर आलीय.**



आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्था 'रॉयटर्स'च्या अहवालानुसार, इराणकडून भारतीय रिफायनरींना विशेष सवलतींसह कच्च्या तेलाची ऑफर देण्यात आली आहे. २०१९ मध्ये अमेरिकेच्या निर्बंधांमुळे भारताने इराणकडून तेल खरेदी पूर्णपणे बंद केली होती. मात्र, सध्याच्या जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर इराण पुन्हा एकदा भारतासाठी ऊर्जा पुरवठ्याचा पर्याय बनत आहे.

भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा कच्च्या तेलाचा आयातदार आणि उपभोक्ता देश आहे. त्यामुळे इराणची ही ऑफर भारतासाठी केवळ आर्थिकच नव्हे, तर धोरणात्मक दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, इराणने 'ICE ब्रेंट'च्या तुलनेत प्रति बॅरल ६ ते ८ डॉलर प्रीमियमवर कच्च्या तेलाची ऑफर दिली आहे. यासोबतच मालाची डिलिव्हरी झाल्यानंतर सात दिवसांच्या आत पेमेंट करण्याची अट ठेवण्यात आली आहे.

पेमेंटच्या बाबतीतही काही लवचिकता दाखवण्यात आली आहे. इराणने व्यवहारासाठी डॉलरमध्ये पेमेंटची मागणी केली असली तरी काही व्यापारी भारतीय रुपयांमध्ये व्यवहार करण्यासही तयार असल्याचे समजते. यामुळे भारतासाठी परकीय चलनाचा ताण काही प्रमाणात कमी होऊ शकतो. भारतीय रिफायनरी कंपन्यांना या ऑफरवर निर्णय घेण्यासाठी साधारण एक महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे.

दरम्यान, होर्मुजच्या सामुद्रधुनीतील तणावामुळे जागतिक तेल पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. इराणने ही सामुद्रधुनी बंद केल्यामुळे केवळ कच्च्या तेलाचाच नव्हे, तर एलपीजीसारख्या महत्त्वाच्या इंधनाचा पुरवठाही अडथळ्यात आला आहे. भारतात एलपीजीचा तुटवडा निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात असून, या पार्श्वभूमीवर इराणची ऑफर अत्यंत महत्त्वाची ठरू शकते. तज्ज्ञांच्या मते, जर ही आयात पुन्हा सुरू झाली, तर भारतातील इंधन संकट काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

दुसरीकडे, अमेरिकेकडूनही काही प्रमाणात दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. ट्रम्प प्रशासनाने समुद्रात अडकलेल्या इराणी तेलाच्या खरेदीसाठी ३० दिवसांची विशेष सवलत जाहीर केली आहे. ही सवलत २० मार्चपर्यंत लोड करण्यात आलेल्या आणि १९ एप्रिलपर्यंत उतरवण्यात येणाऱ्या जहाजांसाठी लागू असेल. या निर्णयामुळे भारतीय कंपन्यांना कोणत्याही कायदेशीर अडचणींशिवाय इराणी तेल खरेदी करण्याची संधी मिळणार आहे.

ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने भारतासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. एका बाजूला जागतिक स्तरावर वाढणारे तणाव आणि दुसऱ्या बाजूला इंधनाच्या वाढत्या मागणीमुळे भारतासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत इराणकडून मिळालेली ही ऑफर भारतासाठी एक मोठा पर्याय ठरू शकते.

यापुढे भारत सरकार आणि तेल कंपन्या कोणता निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जर ही डील यशस्वी झाली, तर भारताच्या ऊर्जा सुरक्षेला बळकटी मिळण्याबरोबरच देशांतर्गत इंधन दरांवरही सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मध्यपूर्वेतील परिस्थितीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी स्पष्टच बोलले

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेनंतर राज्यसभेत इराण युद्ध आणि पश्चिम आशियातील परिस्थितीवर महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली. भारताने नेहमीच संवादाचा मार्ग सुचवला असून सर्व संबंधित देशांशी भारत संपर्कात असल्याचे त्यांनी सांगितले.**



त्यांनी स्पष्ट केले की, भारताने नेहमीच संवाद आणि शांततेचा मार्ग स्वीकारला असून सध्याच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित देशांशी सातत्याने संपर्क ठेवला जात आहे.

पंतप्रधानांनी आपल्या भाषणात अधोरेखित केले की, कोणतेही युद्ध हे मानवतेच्या हिताचे नसते. युद्धामुळे केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक आणि मानवी हानीही मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे सध्याच्या संघर्षाचे समाधान हे केवळ संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातूनच शक्य आहे. भारताने जागतिक स्तरावर शांततेसाठी सातत्याने प्रयत्न केले असून सर्व देशांना शांततापूर्ण मार्गाने तोडगा काढण्याचे आवाहन केले आहे.

ते पुढे म्हणाले की, जर हा संघर्ष दीर्घकाळ चालू राहिला तर त्याचे परिणाम केवळ संबंधित प्रदेशापुरते मर्यादित राहणार नाहीत, तर संपूर्ण जगावर त्याचा परिणाम होईल. विशेषतः जागतिक अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम दिसून येतील. ऊर्जा पुरवठा, व्यापार आणि पुरवठा साखळी यावर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

या पार्श्वभूमीवर भारत परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि गरज भासल्यास योग्य त्या पावले उचलण्यास सज्ज असल्याचेही त्यांनी सांगितले. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मुख्य आधार म्हणजे 'वसुधैव कुटुंबकम्' ही भावना असल्याचे त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले.

याचबरोबर पंतप्रधानांनी आत्मनिर्भरतेवरही भर दिला. त्यांनी सांगितले की, भारत कोणत्याही महत्त्वाच्या क्षेत्रात इतर देशांवर अत्याधिक अवलंबून राहू नये यासाठी केंद्र सरकार विविध उपाययोजना राबवत आहे. शिपबिल्डिंग, संरक्षण क्षेत्र, तसेच रेअर अर्थ मिनरल्ससारख्या धोरणात्मक क्षेत्रांमध्ये स्वयंपूर्णता साधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणि धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत.

पंतप्रधानांनी शेवटी नमूद केले की, सध्याच्या जागतिक परिस्थितीतून सावरण्यासाठी वेळ लागेल, मात्र भारत सक्षमपणे या आव्हानांना सामोरे जाण्यास तयार आहे. देशाच्या दीर्घकालीन हितासाठी सरकार ठोस आणि दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेत आहे, असे त्यांनी विश्वासपूर्वक सांगितले.

## सिव्हिल इन्फ्रास्ट्रक्चरवरील हल्ल्यांचा भारताचा निषेध

पश्चिम आशियातील युद्धाला तीन आठवड्यांपेक्षा अधिक काळ झाला आहे. यामुळे जगात ऊर्जा संकट निर्माण झाले आणि त्याचा परिणाम भारतावरही होत आहे. भारताने नागरिक, नागरी पायाभूत सुविधा, ऊर्जा आणि वाहतूक व्यवस्थेवरील हल्ल्यांचा निषेध केला आहे. तसेच तणाव कमी करण्यासाठी आणि होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराण युद्ध आणि पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीवर महत्त्वपूर्ण भूमिका मांडताना हे स्पष्टच सांगितले.

## युद्धाचे संकट ही देशाच्या धैर्याची परीक्षा

पंतप्रधान नरेंद्र मोदी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेनंतर राज्यसभेत इराण युद्ध आणि पश्चिम आशियातील परिस्थितीवर महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया देताना म्हणाले की, कोणतेही संकट हे देशाच्या धैर्य आणि प्रयत्नांची परीक्षा घेत असते. मागील 11 वर्षांत भारताने अशा संकटांना सामोरे जाण्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. आवश्यक वस्तूंचा पुरवठा भारतात सुरळीत राहावा यासाठी सरकार प्रयत्न करत आहे.

# 'REAL ME' म्हणत प्राजक्ताचा ग्लॅमरस कमबॅक

मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. यावेळी तिच्या अभिनयामुळे नाही, तर तिच्या १५ दिवसांच्या 'डिजिटल डिटॉक्स'नंतरच्या शानदार कमबॅकमुळे ती सोशल मीडियावर ट्रेंड होत आहे. नेहमी सोशल मीडियावर सक्रिय



असणारी प्राजक्ता अचानक १५ दिवसांसाठी ऑफलाइन गेल्याने
चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. काही
दिवसांपूर्वी प्राजक्ताने स्वतः सोशल मीडियावर पोस्ट करून
सांगितलं होतं की, ती पुढील १५ दिवस
कुठेही संपर्कात
राहणार नाही. तिच्या
या निर्णयामुळे
चाहत्यांना धक्का
बसला होता.
अनेकांनी तिच्या
पोस्टवर कमेंट करून कारण
विचारले होते. मात्र, प्राजक्ताने
कोणताही खुलासा न करता
शांतपणे हा 'डिजिटल
ब्रेक' घेतला. आता
ठरल्याप्रमाणे १५
दिवसांनंतर प्राजक्ता
पुन्हा सोशल मीडियावर
परतली आहे. तिने एक
खास फोटोशूट शेअर करत
'REAL ME' असं कॅप्शन
दिलं आहे. पिंक रंगाच्या
ग्लॅमरस ड्रेसमध्ये तिचा हा लुक
चाहत्यांना खूपच आवडला आहे.
तिच्या या फोटोंवर लाईक्स
आणि कमेंट्सचा अक्षरशः
पाऊस पडत आहे. या १५
दिवसांत प्राजक्ता नेमकी कुठे
होती, याबद्दलही तिने माहिती
दिली आहे. ती श्री श्री रविशंकर
यांच्या बेंगळुरू येथील आश्रमात
गेली होती. तिथे तिने 'आर्ट ऑफ
लिव्हिंग'चा 'हॅप्पीनेस प्रोग्राम' हा कोर्स
पूर्ण केला. या कोर्सदरम्यान फोन
वापरण्यास आणि बाहेरील
अन्न खाण्यास परवानगी नसते.
या काळात तिने शारीरिक,
मानसिक आणि भावनिक
अशा तिन्ही स्तरांवर प्रशिक्षण घेतलं.
या अनुभवामुळे प्राजक्तामध्ये
सकारात्मक बदल झाल्याचं ती सांगते.
विशेष म्हणजे, हा कोर्स पूर्ण केल्यानंतर
ती आता 'हॅप्पीनेस प्रोग्राम'ची प्रशिक्षक
(टीचर)ही बनली आहे. लवकरच ती
इतरांना हे प्रशिक्षण देणार असल्याचं
तिने सांगितलं आहे. मात्र, याचवेळी
तिने स्पष्ट केलं की, ती अभिनय
क्षेत्र सोडणार नाही.

# सरकार 4 मध्ये ऐश्वर्या राय बच्चन झळकणार



लोकप्रिय पॉलिटिकल-क्राईम चित्रपट 'सरकार'चे तीन भाग आधी रिलीज झाले आहेत. त्यामध्ये अमिताभ बच्चन, अभिषेक बच्चन, ऐश्वर्या राय बच्चन, मनोज वाजपेयी यांच्या भूमिका होत्या. आता चित्रपट निर्माता राम गोपाल वर्माने ऐश्वर्याबद्दल मोठा खुलासा केला आहे. 'सरकार' हा प्रसिद्ध चित्रपट आहे. या चित्रपटाच्या पुढील दोन्ही फ्रँचायझीची जितकी चर्चा होती, तितकीच चर्चा सरकार ४ बद्दल सुरु आहे. 'गॉडफादर' या चित्रपटापासून प्रेरित असलेल्या या चित्रपटाच्या कथेचा एक वेगळा चाहता वर्ग आहे. इतकेच नाही तर ऐशवर्याचा चाहत्यांचा एक मोठा वर्ग आहे. पण, आता त्या चाहत्यांची निराशा होऊ शकते. राम गोपाल वर्मा यांनी सरकार ४ बद्दल मोठी अपडेट दिलीय. राम गोपाल वर्माला ऐश्वर्याच्या सरकार ४ मधील भूमिकेबद्दल विचारण्यात आले तेव्हा त्याने सांगितले की, "नाही, मुळीच नाही. ऐश्वर्या यात नाही." एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले की, कथेचा आवाका अधिक मोठा असणार आहे. कथा यावेळी वेगळी असेल..." राम गोपाल वर्मा यांनी हे देखील उघड केले की, 'सरकार ४' च्या चित्रीकरणाला पुढील महिन्यात सुरुवात होईल. 'सरकार' मालिकेतील प्रत्येक चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली आहे. दमदार कथा, राजकारणावर आधारित पार्श्वभूमी आणि प्रभावी अभिनय यामुळे या चित्रपटांना प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यामुळे 'सरकार 4' येणार असल्याची शक्यता व्यक्त होताच चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# समीरा रेड्डीला बोबडेपणाची समस्या



अभिनेत्री समीरा रेड्डीने बॉलिवूडमधील अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. तिचे काही चित्रपट हिटही झाले आहेत. प्रेक्षकांना तिने आपल्या अभिनयाची दखल घ्यायला लावली. सध्याच्या घडीला बॉलिवूडमध्ये ती सक्रिय नाही. समीरा विविध मुद्यांवर आपले मत व्यक्त करत असते. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने मोठा खुलासा केला आहे. तिला असा एक आजार होता, ज्यामुळे तिला खूप मानसिक त्रास सहन करावा लागला. अभिनेत्रीने खुलासा केला आहे की, लहानपणी तिच्या तोतरेपणामुळे तिला अनेकदा अपमानित केले जायचे आणि तिची चेष्टा उडवली जायची. त्यामुळे तिला मानसिक त्रास सहन करावा लागायचा. आपला आत्मविश्वास परत मिळवण्यासाठी तिला अनेक वर्षे थेरपी घ्यावी लागली. अभिनेत्री समीरा रेड्डी तिच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखली जाते. प्रसूतीनंतर वाढणारे वजन, आई होण्यातील आव्हाने किंवा नैराश्याची समस्या. ती प्रत्येक विषयावर आपले मत उघडपणे मांडते. "मी लहानपणापासूनच बोबडी होती आणि त्यामुळे मला त्रास दिला जायचा. माझा आत्मविश्वास परत मिळवण्यासाठी मला अनेक वर्षे थेरपी घ्यावी लागली. आजही, जर मी अडखळत बोलले आणि कोणी त्यावर प्रतिक्रिया दिली, तर मला अजूनही वाईट वाटते. लहानपणी लावलेले शिक्के खूप खोलवर परिणाम करू शकतात. हे शिक्के, जरी ते निरुपद्रवी असले तरी, मुलाच्या आत्मविश्वासावर नकळतपणे परिणाम करू शकतात."

# अमेरिकन व्यावसायिकाने खरेदी केली आर. आर

## या ऐतिहासिक व्यवहारामुळे राजस्थान रॉयल्स जगातील सर्वात महागडी फ्रँचायझी ठरली

**महाईन्यूज । जयपूर**

**इंडियन प्रीमियर लीगच्या (IPL) इतिहासातील एका सर्वात मोठ्या व्यावसायिक कराराची नोंद झाली आहे. अमेरिकन उद्योजक कल सोमानी यांच्या नेतृत्वाखालील एका गुंतवणूकदार समूहाने राजस्थान रॉयल्स (RR) या फ्रँचायझीची १०० टक्के भागीदारी सुमारे १.६३ अब्ज अमेरिकन डॉलर्सना (अंदाजे १५,२८९ कोटी रुपये) खरेदी केली आहे. आयपीएलच्या आतापर्यंतच्या प्रवासातील हा सर्वात महागडा व्यवहार मानला जात आहे.**




### कोण आहेत कल सोमानी?

कल सोमानी हे तंत्रज्ञान आणि क्रीडा क्षेत्रातील एक मोठे नाव आहे. त्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि स्पोर्ट्स टेक क्षेत्रात कार्यरत असलेल्या 'इंट्राएज' आणि 'ट्र्यूओ' सारख्या नामांकित कंपन्यांची स्थापना केली आहे. क्रिकेटव्यतिरिक्त त्यांना गोल्फमध्येही विशेष रुची आहे. टायगर वुड्स ज्या क्लबचे प्रमुख चेहरा राहिले आहेत, त्या 'मोटर सिटी गोल्फ क्लब'च्या संस्थापकांपैकी सोमानी एक आहेत. 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या वृत्तानुसार, राजस्थान रॉयल्सच्या लिलाव प्रक्रियेत एकूण ४ निविदा (BIDS) आल्या होत्या, ज्यामध्ये सोमानी यांच्या समूहाने बाजी मारली. या गुंतवणुकीमुळे राजस्थान रॉयल्स संघाच्या भविष्यातील धोरणात्मक आणि तांत्रिक विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या गुंतवणूकदार समूहामध्ये कल सोमानी यांच्यासह जगप्रसिद्ध 'वॉलमार्ट'चे रॉब वॉल्टन आणि 'फोर्ड'शी संबंधित हॅम्प कुटुंबाचाही समावेश आहे. प्राप्त माहितीनुसार, हा मालकी हक्क बदल आयपीएल २०२६ च्या हंगामानंतर अधिकृतपणे प्रभावी होणार आहे.

राजस्थान रॉयल्स हा आयपीएलच्या पहिल्या हंगामाचा (२००८) विजेता संघ आहे. युवा गुणवत्तेला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या या संघाने आगामी हंगामासाठी रियान पराग याच्याकडे कर्णधारपद सोपवले आहे. गेल्या सहा महिन्यांपासून राजस्थान रॉयल्सच्या विक्रीबाबत चर्चा सुरू होत्या. कल सोमानी हे यापूर्वीच या संघात अल्पसंख्याक गुंतवणूकदार (MINORITY INVESTOR) म्हणून सहभागी होते, ज्याचा फायदा त्यांना ही पूर्ण मालकी मिळवताना झाला आहे.

आयपीएलच्या इतिहासात यापूर्वीही मोठे व्यवहार झाले आहेत, मात्र राजस्थान रॉयल्सचा हा व्यवहार सर्व विक्रम मोडणारा ठरला आहे. गेल्या वर्षी टोरेंट ग्रुपने 'सीव्हीसी कॅपिटल पार्टनर्स'कडून गुजरात टायटन्सची ६७ टक्के भागीदारी सुमारे ५,०२५ कोटी रुपयांना विकत घेतली होती. त्यावेळी गुजरात टायटन्सचे एकूण मूल्य ७,५०० कोटी रुपये निश्चित करण्यात आले होते. त्या तुलनेत राजस्थान रॉयल्सचे मूल्य आता दुप्पट झाले आहे.

२००८ मध्ये आयपीएलच्या पहिल्याच हंगामात दिवंगत शेन वॉर्नच्या नेतृत्वाखाली राजस्थान रॉयल्सने विजेतेपद पटकावून सर्वांना चकित केले होते. त्यानंतर प्रदीर्घ काळ या संघाला जेतेपदाने हुलकावणी दिली. २०२२ मध्ये संघाने अंतिम फेरीपर्यंत धडक मारली होती, परंतु गुजरात टायटन्सविरुद्ध त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते.

संघाचे क्रिकेट संचालक आणि मुख्य प्रशिक्षक कुमार संगकारा यांनी प्रतिक्रिया दिली की, "सॅम करनसारख्या खेळाडूची अनुपस्थिती संघासाठी मोठी हानी आहे, मात्र दासुन शनाकाच्या अनुभवामुळे संघाचा समतोल राखण्यास मदत होईल." मालकी हक्कातील हा बदल पुढील वर्षापासून लागू होणार असला तरी, राजस्थान रॉयल्सचे सध्याचे संपूर्ण लक्ष आगामी हंगामावर आहे. नवीन कर्णधार रियान पराग आणि प्रशिक्षक कुमार संगकारा यांच्या मार्गदर्शनाखाली राजस्थानचा संघ ३० मार्च रोजी गुवाहाटी येथे चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध आपला पहिला सामना खेळणार आहे.

# बलात्काराचा आरोप असलेला यश दयाल 'आरसीबी'कडून खेळणार नाही

**महाईन्यूज । बंगळूरु**

**बलात्काराचा आरोप असलेला वेगवान गोलंदाज यश दयाल आयपीएल २०२६ च्या हंगामात आमच्या संघातून खेळणार नाही, असे रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (RCB)ने हे स्पष्ट केले आहे. लिलावापूर्वी संघातील कायम असणाऱ्या खेळाडूंना यादी जाहीर झाली होती, तेव्हा आरसीबीने दयालला कायम ठेवल्यामुळे मोठा गदारोळ झाला होता. मात्र, सराव सत्रांमध्ये त्याची अनुपस्थिती पाहता तो संघात नसल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. आता आरसीबीने स्पष्ट केले आहे की, "वैयक्तिक कारणास्तव" तो यावर्षी खेळणार नाही.**



आरसीबीचे 'डायरेक्टर ऑफ क्रिकेट' मो बोबॅट यांनी स्पष्ट केले की, यश दयाल अद्याप फ्रँचायझीसोबत करारबद्ध असला तरी, तो आगामी हंगामात संघाचा भाग असणार नाही. माध्यमांशी बोलताना बोबॅट म्हणाले, "यश सध्या एका कठीण वैयक्तिक परिस्थितीतून जात आहे. तो अजूनही आमच्या करारात आहे, पण या हंगामात तो आमच्यासोबत नसेल."

२०२५ च्या आयपीएलमध्ये आरसीबीला विजेतेपद मिळवून देण्यात यश दयालने महत्त्वाची भूमिका बजावली होती, त्याने संपूर्ण हंगामात १३ बळी घेतले होते. मात्र, गेल्या वर्षीच्या फायनलपासून तो क्रिकेटच्या मैदानापासून दूर आहे. त्याच्यावर सध्या कायदेशीर कारवाई सूरू आहे. दरम्यान, आरसीबीच्या भुवनेश्वर कुमार आणि कृणाल पंड्या यांच्या साथीला यश दयालची डावखुरी वेगवान गोलंदाजी हा संघासाठी जमेची बाजू होती. तो करारात असल्याने आरसीबीला त्याच्या जागी दुसरा बदली खेळाडू घेता येणार नाही. आता भुवनेश्वर कुमार, जोश हेझलवूड, नुवान थुशारा, जेकब डफी आणि रसिक सलाम यांसारख्या खेळाडूंवर गोलंदाजीची मदार असेल.

### यश दयालवर कोणते आरोप?

क्रिकेटपटू यश दयालवर जुलै २०२५ मध्ये उत्तर प्रदेशमधील गाझियाबादच्या इंदिरापुरम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. महिलेने आरोप केला आहे की, लग्नाचे आमिष दाखवून ५ वर्षांच्या संबंधात दयालने तिचे शारीरिक आणि मानसिक शोषण केले. यानंतर जयपूरमध्ये 'पोक्सो' (POCSO) कायद्यांतर्गत दुसरा गुन्हा दाखल झाला आहे. एका अल्पवयीन मुलीने आरोप केला आहे की, २०२३ पासून दयालने तिचे अनेकदा लैंगिक शोषण केले. २०२५ च्या आयपीएल दरम्यान एका हॉटेलमध्ये तिच्या करिअरमध्ये मदत करण्याचे आश्वासन देऊन त्याने अत्याचार केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाने गाझियाबाद प्रकरणात त्याच्या अटकेला स्थगिती दिली होती. डिसेंबर २०२५ मध्ये जयपूरच्या पोक्सो न्यायालयाने त्याचा अगाऊ जामीन अर्ज फेटाळून लावला होता. पुराव्यांचे गांभीर्य लक्षात घेता तपास अद्याप सुरू आहे. त्यामुळे तो आरसीबी संघाकडून खळणार नसल्याचे संघाने स्पष्ट केले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
ePaper
। बुधवार ।
दि. 25 मार्च 2026।



# भोसरीत भाजपा बूथ सक्षमीकरण अन् कार्यकर्त्यांमधील समन्वयावर भर!

## भाजपा शहर वरिष्ठ उपाध्यक्ष संजय पटनी यांची माहिती

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**भाजपाच्या संघटनात्मक ताकदीवर भर देताना, भोसरी विधानसभा मतदारसंघात नुकतीच महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत संजय पटनी यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना संघटनात्मक बांधणी, बूथ सक्षमीकरण आणि कार्यकर्त्यांमधील समन्वयाबाबत माहिती दिली. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे आणि शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम प्रभावीपणे राबवला जात आहे.**



> संघटन हीच भाजपाच्या यशाची खरी गुरुकिल्ली आहे. आम्ही फक्त निवडणुकांसाठी काम करत नाही; भाजप ३६५ दिवस, वर्षभर, जनसेवा आणि संघटनाच्या बांधणीसाठी कार्यरत आहे. प्रत्येक बूथ, प्रत्येक कार्यकर्ता आणि प्रत्येक कार्यक्रम हे आपल्यासाठी संधी आहेत, जिथे आपण समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचू शकतो. एकत्रितपणे, शिस्तबद्ध आणि कार्यक्षम संघटनेच्या माध्यमातून आपण भोसरी विधानसभा आणि पिंपरी-चिंचवड शहरात भाजपाची ताकद अधिकाधिक वाढवू शकतो.
>
> **- संजय पटनी, वरिष्ठ उपाध्यक्ष, भाजपा.**

बैठकीस भाजपाचे सरचिटणीस विकास डोळस, पदाधिकारी मंगेश गुरव, मंडल अध्यक्ष शिवराज लांडगे, अजय साने, प्रमोद परदेशी, रामदास कुटे आणि आमदार सहाय्यक सचिन फोंडके उपस्थित होते. सर्व उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी संजय पटनींच्या मार्गदर्शनाखाली एकसंघ, शिस्तबद्ध आणि कार्यक्षम संघटनेच्या माध्यमातून भोसरी विधानसभा आणि पिंपरी-चिंचवड शहरात भाजपाची ताकद वाढवण्याचा निर्धार व्यक्त केला.

संजय पटनी म्हणाले की, “संघटन हीच आपली खरी शक्ती आहे. भाजप फक्त निवडणुकीसाठी नव्हे, तर ३६५ दिवस जनसेवेसाठी आणि संघटन वाढीसाठी कार्यरत असते. माझा आग्रह आहे की प्रत्येक कार्यकर्ता आपल्या कार्यात प्रामाणिकपणा, उत्साह आणि समर्पण घेऊन पुढे येईल, कारण संघटनाच्या जोरावरच आपला विजयी मार्ग निश्चित होतो."

# महापालिकेचे कर्ज अन् दायित्वबाबत स्पष्ट खुलासा करावा : राहुल जाधव

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**महापालिकेच्या अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभेत माजी महापौर राहुल जाधव यांनी महापालिकेवरील कर्ज आणि दायित्वाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत प्रशासनाकडून सविस्तर खुलासा करण्याची मागणी केली.**





> महापालिकेची आर्थिक स्थिती भक्कम आणि पारदर्शक ठेवणे ही आमची सामूहिक जबाबदारी आहे. कर्ज आणि दायित्वाबाबत नागरिकांमध्ये कोणताही संभ्रम राहू नये, यासाठी प्रशासनाने स्पष्ट आणि अधिकृत आकडेवारी समोर मांडली पाहिजे. योग्य नियोजन, आर्थिक शिस्त आणि जबाबदार निर्णयांच्या माध्यमातून आपण हे दायित्व सक्षमपणे व्यवस्थापित करू आणि शहराच्या विकासाला कुठेही खीळ बसू देणार नाही.
>
> **- राहुल जाधव, माजी महापौर.**

गेल्या काही दिवसांत प्रसारमाध्यमांमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सुमारे ६ हजार कोटी रुपयांच्या दायित्वाखाली असल्याच्या बातम्या वारंवार प्रसिद्ध होत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे जाधव यांनी नमूद केले.

सभागृहात प्रश्न उपस्थित करताना त्यांनी विचारले की, प्रत्यक्षात महापालिकेवर किती कर्ज आहे आणि एकूण दायित्व किती आहे, याची स्पष्ट आणि अधिकृत माहिती प्रशासनाने द्यावी. अपूर्ण किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीमुळे शहराची प्रतिमा खराब होत असल्याचीही त्यांनी खंत व्यक्त केली.

तसेच, महापालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत पारदर्शकता राखणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत, जाधव यांनी पुढे विचारले की, वाढत्या दायित्वाचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रशासनाने कोणत्या ठोस उपाययोजना आखल्या आहेत? आर्थिक शिस्त राखण्यासाठी कोणते धोरण अवलंबले जात आहे? याबाबतही सविस्तर माहिती सभागृहात सादर करावी. महापौर आणि आयुक्तांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन नागरिकांच्या शंकांचे निरसन करावे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

यावेळी माजी महापौर राहुल जाधव यांनी बीआरटी, टीपी, रस्ते विकसित करताना विविध विभागांचा समन्वय सक्षम असावा. नवीन डीपी लागू करताना ताब्यात असलेली आरक्षणे विकसित झाली पाहिजे, याकडे लक्ष वेधले. विकासकामे करताना एखादा अधिकारी स्वत:ला मोठा समजत असेल, तर महापालिकेचे नुकसान आहे. महापालिकेच्या मिळकतींचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

# बेपत्ता आकाशचा १८ दिवसांनंतर अखेर सुखरूप शोध

## भाजपा युवा मोर्चा मंडलाध्यक्ष विवेक बारोट यांच्या पुढाकारामुळे कुटुंबाशी पुनर्भेट

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**ठाणे येथून बेपत्ता झालेल्या 'आकाश' या मुलाचा तब्बल १८ दिवसांनंतर सुखरूप शोध लागून त्याची कुटुंबाशी पुनर्भेट झाली आहे. या संपूर्ण प्रकरणात विवेक दीपक बारोट यांच्या तत्परतेने आणि सामाजिक बांधिलकीतून केलेल्या प्रयत्नांमुळे या घटनेचा सुखांत झाला आहे.**



आकाश हा मुलगा २ मार्च रोजी ठाणे येथून बेपत्ता झाला होता. कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला, मात्र अनेक दिवस त्याचा काहीही ठावठिकाणा लागत नव्हता. दरम्यान, पिंपरी-चिंचवडमधील मोहननगर परिसरात रात्रीच्या सुमारास भटकताना तो विवेक बारोट आणि त्यांच्या टीमच्या नजरेस पडला.

आकाशला बोलता येत नसल्यामुळे त्याची ओळख पटवणे हे मोठे आव्हान होते. मात्र वेळ न दवडता विवेक बारोट यांनी पोलिसांच्या मदतीने त्याला सुरक्षितपणे 'स्पेशल चाइल्ड केअर होम'मध्ये दाखल केले.

यानंतर त्यांनी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करत आकाशचे फोटो व व्हिडिओ इंस्टाग्रामवर शेअर केले. ही पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आणि अनेकांकडून प्रतिसाद येऊ लागले. अखेर १८ मार्च रोजी एका व्यक्तीने संपर्क साधून स्वतःला आकाशचा भाऊ असल्याचे सांगितले. आवश्यक कागदपत्रे व पोलीस तक्रारीद्वारे त्याची ओळख निश्चित करण्यात आली.

ओळख पटताच आकाशचे कुटुंबीय तातडीने ठाण्याहून पुण्याकडे रवाना झाले. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून विवेक बारोट आणि त्यांच्या टीमने आकाशला सुखरूप कुटुंबाच्या स्वाधीन केले. १८ दिवसांनंतर मुलाला पाहून पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले.

> एक तरुण मुलगा रस्ता चुकल्याचे पाहून आम्हाला काळजी वाटली. तो बोलू शकत नसल्याने आव्हाने होती, पण सोशल मीडियाच्या ताकदीमुळे आणि आमच्या टीमच्या प्रयत्नांमुळे आम्ही त्याच्या कुटुंबापर्यंत पोहोचू शकलो. आकाश सुखरूप घरी परतल्याचा आम्हाला मोठा आनंद आहे.
>
> **- विवेक बारोट, अध्यक्ष, भाजयुमो मंडळ.**

या घटनेविषयी बोलताना विवेक बारोट म्हणाले की, "रस्त्यावर एक तरुण मुलगा हरवलेला दिसताच आम्हाला काळजी वाटली. तो बोलू शकत नसल्याने अडचणी होत्या, पण सोशल मीडियाच्या मदतीने आणि टीमच्या प्रयत्नांनी आम्ही त्याच्या कुटुंबापर्यंत पोहोचलो. तो सुखरूप घरी परतला, याचा आम्हाला आनंद आहे." या संपूर्ण मोहिमेत त्यांच्या टीमनेही मोलाचे सहकार्य केले. विवेक बारोट यांच्या या सामाजिक कार्याचे परिसरातून मोठ्या प्रमाणात कौतुक होत असून, त्यांच्या पुढाकारामुळे एका कुटुंबाला पुन्हा आपला हरवलेला मुलगा मिळाला आहे.

# निर्भय कन्या अभियान: चिंचवडमध्ये कराटे व महिला हक्क कार्यशाळा उत्साहात

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि प्रतिभा शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने "निर्भय कन्या अभियान" अंतर्गत आज प्रतिभा शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या सभागृहात एक दिवसीय कराटे प्रात्यक्षिक व महिला हक्क व संरक्षण विषयक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.**



कार्यक्रमाचे उद्देश महाविद्यालयातील मुलींमध्ये स्वसंरक्षणाची जाणीव, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्व विकास घडवणे होते. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात स्वसंरक्षणाचे महत्त्व समजावणे तसेच वैयक्तिक सुरक्षिततेबाबत जागरूक करणे हाही या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता.

कमला एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा प्रतिभा शहा आणि सचिव डॉ. दीपक शाह यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम, कराटे प्रशिक्षक सतीश राजहंस, सारिका राजहंस, शिवानी राजहंस, अँड. शुभा पिल्ले आणि विद्यार्थी विकास अधिकारी अँड. प्रा. गीता कांबळे उपस्थित होते.

> आजच्या युवा पिढीसाठी स्वसंरक्षण फक्त कौशल्य नाही, तर आत्मविश्वास आणि स्वाभिमान वाढविण्याचे माध्यम आहे. मुलींना सुरक्षिततेसाठी सज्ज करणे हीच खरी शिक्षणाची जबाबदारी आहे.
>
> **- डॉ. दीपक शाह, सचिव.**

कराटे प्रशिक्षक सतीश, सारिका आणि शिवानी राजहंस यांनी विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी महिला सुरक्षिततेसाठी सतर्क राहण्याचे, आत्मविश्वास वाढविण्याचे आणि परिस्थितीचे त्वरित आकलन करून योग्य निर्णय घेण्याचे तंत्र शिकवले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सराव करून स्वसंरक्षणाच्या मूलभूत हालचाली आत्मसात केल्या.

कार्यशाळा अत्यंत संवादात्मक आणि माहितीपूर्ण ठरली. विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतल्याने शारीरिक तसेच मानसिक तयारीचे महत्त्व समजले. महिला हक्क व संरक्षण विषयक मार्गदर्शन अँड. डॉ. शुभा पिल्ले यांनी केले आणि विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान केले. कार्यक्रमाची सांगता प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम यांनी सत्कार करून केली, तर प्रस्तावना व आभार मानले विद्यार्थी विकास अधिकारी अँड. प्रा. गीता कांबळे यांनी.

### स्वसंरक्षणाची गरज अधोरेखित

निर्भय कन्या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये स्वसंरक्षणाची जाणीव, आत्मविश्वास आणि सुरक्षिततेबाबत सजगता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. कराटे प्रात्यक्षिक आणि महिला हक्कांवरील मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींना प्रत्यक्ष परिस्थितीत स्वतःचे संरक्षण कसे करावे, तसेच कायदेशीर हक्कांची माहिती मिळाली. अशा उपक्रमांमुळे मुली मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम बनण्यास मदत होते.

# Healthy Sleep, Bright Future



In today's fast-moving world, sleep is often treated as a luxury rather than a necessity. Many students stay up late to complete assignments, scroll on mobile phones, or watch television, thinking it will help them achieve more. However, in reality, proper sleep is one of the most important factors for a healthy and successful life.

Sleep is not just about resting the body—it is about refreshing the mind. When students get enough sleep, they can concentrate better, understand lessons more clearly, and remember what they learn. A well-rested child walks into the classroom with energy, confidence, and a positive attitude.

As teachers, we guide students every day, but this responsibility is shared with parents. A child's routine begins at home. If parents stay awake late at night, children naturally follow the same pattern. This is why it is important for parents to create a healthy sleep environment.

Students should ideally sleep early, around 10 p.m., and wake up fresh between 6–7 a.m. Even if parents sleep late due to work or other reasons, they should ensure that their children go to bed on time. In fact, when parents try to improve their own habits, it sends a powerful message—because children learn more from what they see than what they are told.

Parents also play a key role. Even if they sleep late, they must ensure their children follow a healthy routine. Children learn habits by watching their parents, so a good example matters.

"A good laugh and a long sleep are the best cures in the doctor' book.".

By
Ms.Archana Bhika
Pre Primary Teacher
Priyadarshani School
Moshi.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE

